रुपांतरीत प्रश्नपत्रिका जुलै 2026

**SUBJECT: GEOGRAPHY (39)**

**TOTAL MARKS :** 80

**July 2026**

**सूचना :**

(i) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.

(iii) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.

(iv) नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.

(v) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(vi) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.

**प्र. १. दिलेल्या सूचनेनुसार खालील उपप्रश्न सोडवा. (गुण 20)**

**(अ) अ, ब आणि क स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून ओळखून पूर्ण करा : (गुण ५)**

| अ. क्र. | अ | ब | क |
|---|---|---|---|
| (१) | स्थलांतर | (क) मांसप्रक्रिया | (य) कुटिरोद्योग |
| (२) | नागरी समस्या | (ख) संदेशवहन | (र) दुग्धप्रक्रिया |
| (३) | प्राणिजन्य उद्योग | (ग) कागदीलगदा प्रक्रिया | (ल) वाहतूक |
| (४) | तृतीयक आर्थिक क्रिया | (घ) झोपडपट्टीमध्ये वाढ | (व) हवामानशास्त्र |
| (५) | प्राकृतिक भूगोल | (ड) भूरूपशास्त्र | (श) अनैच्छिक |
| | | (ङ) ऐच्छिक | (स) गुन्हेगारी |

**(ब) खालील विधाने व कारणे यातील अचूक सहसंबंध ओळखा : (गुण ५)**

(A: विधान, R: कारण)

**(i)**

**A :** लोकसंख्येच्या मनोऱ्यात रुंद तळ हा बालकांची संख्या अधिक असल्याचे दाखवितो.

**R :** लोकसंख्या मनोऱ्याचे रुंद शीर्ष वृद्धांची संख्या अधिक असल्याचे द्योतक आहे.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ङ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे Aचे अचूक स्पष्टीकरण नाही.

**(ii)**

**A :** वस्तीचे विविध प्रकार असतात.

**R :** विविध प्राकृतिक घटकांचा वस्तीच्या विकासावर परिणाम होतो.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे Aचे अचूक स्पष्टीकरण नाही.

**(iii)**

**A :** मुंबई येथील दमट हवामान सुती वस्त्रोद्योगास पूरक आहे.

**R :** मुंबई येथे मोठ्या प्रमाणात सिमेंट उद्योग आढळतात.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे Aचे अचूक स्पष्टीकरण नाही.

**(iv)**

**A :** वाहतूक ही द्वितीयक आर्थिक क्रिया आहे.

**R :** द्वितीयक आर्थिक व्यवसायात वाहतुकीची भूमिका महत्त्वाची असते.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे Aचे अचूक स्पष्टीकरण नाही

**(v)**

**A :** भूगोलात केवळ मानवी घटकांचा अभ्यास केला जातो.

**R :** भूगोल अभ्यासकांना विविध कौशल्यांची आवश्यकता आहे.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे Aचे अचूक स्पष्टीकरण नाही.

**(क) पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा : (गुण ५)**

**(i) उतरत्या वयोगटानुसार योग्य क्रम लावा -**

(अ) बालक

(ब) प्रौढ

(क) वृद्ध

(ड) युवा

**(ii) वस्त्यांच्या आकारानुसार मोठ्यापासून लहानाकडे योग्य क्रम लावा -**

(अ) उपनगर

(ब) महाकायनगर

(क) नगर

(ड) महानगर

**(iii) जास्त भांडवल गुंतवणुकीनुसार उद्योग उतरत्या क्रमाने लावा**

(अ) सुतारकाम

(ब) लोहपोलाद उद्योग

(क) खेळणी निर्मिती उद्योग

(ड) दुग्धप्रक्रिया उद्योग

**(iv) तृतीयक व्यवसाय ओळखा -**

(अ) शिकार

(ब) शेती

(क) व्यापार

(ड) सुतीकापड उद्योग

**(v) भूगोल अभ्यासकाच्या कौशल्यातील अयोग्य घटक ओळखा -**

(अ) निरीक्षण

(ब) नकाशा निर्मिती

(क) विदा संकलन

(ड) संवाद कौशल्य

**(ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा : (गुण ५)**

(i) लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण हे देशाच्या विकासाचे द्योतक आहे.

(ii) वस्त्यांचे कार्यानुसार वर्गीकरण करता येत नाही.

(iii) साखर उद्योग हे कच्चामाल उत्पादन क्षेत्राजवळ स्थापन होतात.

(iv) बंदरासाठी दंतुर किनारीप्रदेश अयोग्य असतात.

(v) भारतामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत.

**प्र. २. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही चार) : (गुण १२)**

(i) विकसित राष्ट्रांमध्ये शेतीव्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या कमी आहे.

(ii) rural वसाहतींमध्ये भूमिउपयोजन हे शेतीशी निगडित असते.

(iii) विस्तृत शेती हा व्यापारी शेतीचा प्रकार आहे.

(iv) जगात उद्योगधंद्यांचे वितरण असमान असते.

(v) पनामा कालवा पॅसिफिकचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते.

(vi) प्रादेशिक विकासात प्राकृतिक घटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**प्र. ३. फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (गुण ९)**

(i) देणारा प्रदेश आणि घेणारा प्रदेश

(ii) ग्रामीण वस्ती आणि शहरी वस्ती

(iii) उद्यान शेती आणि मंडई शेती

(iv) अवजड उद्योग आणि हलके उद्योग

(v) प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल

**प्र. ४. (अ) तुम्हास दिलेल्या जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी योग्य चिन्हाच्या साहाय्याने दाखवा आणि सूची तयार करा (कोणतेही सहा) : (गुण ६)**

(i) आशियातील सर्वाधिक लोकसंख्या घनता असलेला देश

(ii) सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील साक्षरता कमी असणारा आफ्रिकन प्रदेश

(iii) संयुक्त संस्थानातील व्यापारी शहर

(iv) दक्षिण अमेरिकेतील व्यापारी तत्त्वावर चालणारे पशुपालन क्षेत्र


(v) पर्थ औद्योगिक प्रदेश


(vi) मुंबई ते लंडन विमान मार्ग

(vii) दक्षिण गोलार्धातील बर्फाच्छादित खंड

(viii) नाईल नदीचे खोरे

**(ब) दिलेल्या स्तंभालेखाचे (विविध प्रदेशातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी) वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा : (गुण ५)**



**प्रश्न :**

(i) दिलेल्या स्तंभालेखात काय दर्शविले आहे?

(ii) 'ब' प्रदेशात दारिद्र्यरेषेखालील किती लोकसंख्या आहे?

(iii) सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या प्रदेशात आहे?

(iv) दारिद्र्यरेषेखालील सर्वात कमी टक्केवारी कोणत्या प्रदेशात आहे?

(v) ४५% दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या कोणत्या प्रदेशात आहे?

**प्र. ५. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) : (गुण १२)**

(i) हवामानाचा लोकसंख्या वितरणावरील परिणाम

(ii) मालकीवर आधारित उद्योगांचे वर्गीकरण

(iii) जलवाहतूक

(iv) प्रादेशिक असमतोल दूर करण्याची धोरणे

(v) भूगोलाचे स्वरूप

**प्र. ६. (अ) खाली दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (गुण ४)**

**जागतिक लोकसंख्या विकास** १९५० पासून पृथ्वीवर राहणाऱ्या एकूण लोकांची संख्या दुप्पट झाली आहे आणि ती वाढतच आहे. २०१५ मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे ७.३८ अब्ज होती. सामान्य युगाच्या सुरुवातीपासून जगाच्या लोकसंख्येच्या विकासावर एक नजर टाकल्यास असे दिसून येते की संख्येत इतकी वाढ अभूतपूर्व आहे. ब्लॅक डेथने जगभरात सुमारे २५ दशलक्ष लोकांचा बळी घेतल्यानंतर, १४ व्या शतकात लोकसंख्येमध्ये प्रथमच लक्षणीय वाढ झाली. त्यानंतर १९५० आणि २००० च्या दरम्यान जागतिक लोकसंख्या हळूहळू परंतु स्थिरपणे वाढली.

जगातील बहुसंख्य लोकसंख्या आशिया खंडात राहते. सुमारे १०० वर्षांमध्ये, असा अंदाज आहे की आफ्रिकन खंडातील लोकसंख्येची पातळी आज आशियामध्ये आपण पाहत असलेल्या पातळीवर पोहोचली असेल. जगाच्या लोकसंख्येच्या विकासाच्या अंदाजानुसार २२ व्या शतकापर्यंत ही आकडेवारी १० अब्जांपेक्षा जास्त पोहोचेल असा अंदाज आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे पृथ्वीला धोका निर्माण होत आहे. प्रचंड लोकसंख्या वाढीच्या गतीने अन्न आणि संसाधनांच्या वापराचे प्रमाणही वाढत आहे. शास्त्रज्ञांना काळजी वाटते की नैसर्गिक संसाधने, जसे की तेल आणि अन्न संसाधने दुर्मीळ होतील, ज्यामुळे मानवजाती आणि त्याहीपेक्षा जगाची परिसंस्था धोक्यात येईल.

**प्रश्न :**

(१) जागतिक लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ प्रथम कधी झाली?

(२) जगातील सर्वाधिक लोकसंख्येला कोणता खंड आधार देतो?

(३) २२व्या शतकापर्यंत जगाची अंदाजे लोकसंख्या किती असेल?

(४) वाढती लोकसंख्या पृथ्वीला धोका आहे असे तुम्हाला वाटते का? कसे?

**(ब) आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन ) : (गुण ४)**

(i) जगातील गवताळ प्रदेशांचे प्रकार व नावे

(ii) उत्पादनावर आधारित उद्योगांचे प्रकार

(iii) व्यापार आणि वाणिज्य या तृतीयक आर्थिक क्रियांचे वर्गीकरण

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा (कोणताही एक) : (गुण ८)**

(i) शेतीचे विविध प्रकार सांगून कोणतेही दोन प्रकार स्पष्ट करा.

(ii) लोकसंख्या संक्रमण सिद्धांत स्पष्ट करा.

सदरची प्रश्नपत्रिका मुळ प्रश्नपत्रिकेवरुन सरावासाठी रुपांतरीत करण्यात आलेली आहे.
मुळ प्रश्नपत्रिका मुख्यग्राह्य धरण्यात यावी